<u>शासकीय कार्यालयांच्या नुतनीकरणाची कामे महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळामार्फत करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: भांखस २०१८/प्र.क्र.११९/उद्योग-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ३० ऑक्टोबर, २०१८

शासन परिपत्रक:-

खरेदीची सुधारित नियमपुस्तिका शासन निर्णय, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ मधील परिच्छेद ५.१४ मध्ये सुक्ष्म व लघु उद्योगांकरीता २४१ वस्तू राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत व त्यानुषंगाने सदर राखीव वस्तूंची खरेदी, निविदा प्रक्रिया केवळ सुक्ष्म व लघु उद्योजक अथवा लघुउद्योग विकास महामंडळ यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात आलेली आहे. सदर राखीव वस्तूंमध्ये कार्यालयीन फर्निचर व लाकडी फर्निचर इत्यादी बाबींचा समावेश आहे. तसेच महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ राज्यातील लघुउद्योग घटकांच्या वतीने विविध शासकीय विभागांच्या खरेदी निविदेमध्ये भाग घेऊन त्यांना विपणन सहाय्य करते. महामंडळाकडे चांगल्याप्रतीचे मॉड्युलर फर्निचर उत्पादन करणारे लघुउद्योग घटक विपणन सहाय्य योजनेंतर्गत नोंदणीकृत आहेत. महामंडळाकडे बऱ्याच शासकीय विभागांमार्फत मॉड्युलर फर्निचर वापरुन त्यांच्या कार्यालयासाठी कर्मचाऱ्यांची आसन व्यवस्था, अभिलेख उत्तम रितीने साठविण्याची व्यवस्था तसेच कार्यालयाची रंगरंगोटी, विद्युत व्यवस्था करुन देण्याबाबत मागणी करण्यात येते. महामंडळाकडे मॉड्युलर फर्निचरसाठी नोंदणीकृत असलेल्या उद्योग घटकांकडे अशा प्रकारची कामे करण्यासाठी कुशल कारागीर तसेच वास्तुविशारदांचे पॅनलसुध्दा उपलब्ध आहेत. नुतनीकरणाची कामे ही फक्त लघुउद्योग घटकांमार्फतच करण्यात येतात. या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात फर्निचरचा समावेश असल्याने तसेच सदरचे फर्निचर हे लघुउद्योग घटकांनी स्वत: उत्पादित केले असल्यामुळे त्यांना महामंडळामार्फत व्यवसाय मिळण्यास मदत होते. महामंडळामार्फत यापूर्वी आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासकीय रुग्णालये, इत्यादी शासकीय कार्यालयांची नुतनीकरणाची कामे करण्यात आलेली आहेत.

२. स्थापत्य कामांच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या अनुषंगिक कामाच्या बाबतीत महामंडळास यापूर्वी शासन स्तरावरुन शासकीय कार्यालयाच्या नुतनीकरणाची कामे विहीत अटी व शर्तींच्या अधीन राहून, शासकीय कार्यालयांकडून त्यांच्या स्तरावरुन विहीत सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन देण्यात आलेली आहे. यात प्रामुख्याने खर्चाच्या आराखड्यास/अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता घेणे, कामकाजाच्या गुणवत्तेचा दर्जा राखणे इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे.

३. उपरोक्त सर्व वस्तुस्थिती पाहता शासनाच्या अधिपत्याखालील सर्व विभागांना/कार्यालयांना विनंती करण्यात येते की, राज्यातील सुक्ष्म व लघुउद्योग घटकांना प्रोत्साहन मिळावे तसेच त्यांच्या सक्षमीकरणासाठी सदर घटकांना विपणन सहाय्य मिळावे याद्दष्टीकोनातून शासकीय विभागांच्या/कार्यालयांच्या नुतनीकरणाची कामे महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास मंडळाच्या माध्यमातून विहीत प्रक्रियेच्या अधीन राहून त्यांच्या स्तरावरुन देऊ शकतील. तथापि, सदर बाब हि पुर्णत: ऐच्छिक स्वरुपाची असून सदर घटकांना विपणन सहाय्य मिळावे याद्दष्टीकोनातून विपणन प्रक्रियेचा एक भाग म्हणून सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८१०३११६२३५००११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Namdeo Kondiba Bhosale

Digitally signed by Namdeo Kondiba Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db1ca2341132b954db9052b5ef3bd93e7410456a96fa70df7ff81c68231fcd3, serialNumber=8c6a286229ecc7982a08553f49d547ef64be25c7f26fc96324ece7cccbfeb8c5, cn=Namdeo Kondiba Bhosale
Date: 2018.10.31 16:29:57 +05'30'

(डॉ. ना. कों. भोसले)
उप सचिव (उद्योग)

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
४) महाराष्ट्र राज्यातील सर्व मा. संसद सदस्य
५) महाराष्ट्र राज्यातील सर्व मा. विधानसभा व विधानपरिषद सदस्य
६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव
८) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९) प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद (पत्राने)
१०) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद (पत्राने)
११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
१२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (२ प्रती)
१३) प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१४) महाराष्ट्र राज्यातील सर्व मुख्य माहिती आयुक्त यांचे उप सचिव
१५) विकास आयुक्त, (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई -३२
१६) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१७) पोलिस महासंचालक, मुंबई
१८) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, ३ रा मजला, मध्यवर्ती शासकीय इमारत, पुणे ४११००१
२०) आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे
२१) आयुक्त (मत्स्यव्यवसाय), तारापोरवाला मत्सालय, चर्नी रोड, मुंबई
२२) आयुक्त (दुग्धव्यवसाय), वरळी दुग्धशाळा, वरळी सी फेस, मुंबई
२३) शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
२४) संचालक, लेखा व कोषागारे, प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई
२५) विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, माझगाव, मुंबई
२६) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई
२७) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२८) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय, सीएसटी, मुंबई
२९) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
३०) साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, पुणे
३१) पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३२) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर
३३) आयुक्त, महिला व बालविकास पुणे
३४) अप्पर पोलिस महासंचालक व कारागृह महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
३५) मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख (संबंधित प्रशासकिय विभागांच्या मार्फत)
३६) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
३७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
३८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई

३९) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई

४०) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर

४१) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र -२, नागपूर

४२) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४

४३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

४४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

४५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

४६) सर्व आयुक्त,महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य

४७) सर्व नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी

४८) सदस्य सचिव, महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड, छत्रपती शिवाजी मार्केट बिल्डींग, ४ था मजला, पलटन रोड, मुंबई ४०० ००१

४९) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८

५०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, हॉंगकॉंग बिल्डींग, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ००१

५१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॉम), निर्मल बिल्डिंग, १ ला मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

५२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबई

५३) व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ, वॉर्डन हाऊस, ५ वा मजला, सर पी.एम. रोड, मुंबई ४०० ००१

५४) व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा विकास महामंडळ, विकास भवन, डॉ. राजेंद्रप्रसाद मार्ग, औरंगाबाद ४३१००१

५५) व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, कुबेरा चेंबर्स, रेडक्रॉस हाऊस, संचेती हॉस्पिटलजवळ, डॉ. राजेंद्रप्रसाद रोड, पुणे ४११ ००५

५६) व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ विकास महामंडळ, महाजन बिल्डींग, मेन रोड, सिताबर्डी,नागपूर-१२

५७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, लोटस हाऊस, ३३-ए, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०

५८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ, प्लॉट क्र. २१४, बॅकबे रेक्लेमेशन, रहेजा सेंटर, १२ वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

५९) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ,“कृपानिधी ”९, वालाचंद हिराचंद मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८

६०) अध्यक्ष, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन, द्वारा : -सिकॉम, निर्मल बिल्डींग, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

६१) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र वन विकास महामंडळ, ६-ए, नवाज ले-आऊट, टिळक नगर, अमरावती रोड, नागपूर १०

६२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, ३७०, भाखुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६

६३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, प्लॉट क्र. बी, सर्व्हे क्रमांक ५८३, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ००९

६४) व्यवस्थापकीय संचालक, मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ, एम.के.एम. इंटरनॅशनल हाऊस, १७८, बॅकबे रेक्लमेशन, बी. एम. चिनॉय मार्ग, मुंबई ४०० ०२०

६५) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र तेलबिया, वाणिज्य आणि उद्योग महामंडळ, २०१, जॉली भवन क्रमांक २, २ रा मजला, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०

६६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ॲग्रीकल्चर फर्टिलायझर प्रमोशन महामंडळ (मॅपको) मिस्त्री भवन, ६ वा मजला, दिनशा वाच्छा मार्ग, मुंबई ४०० ०२०

६७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, मेंढी फार्म, गोखले नगर, पुणे ४११०१६

६८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वियाणे महामंडळ, प्लॉट क्रमांक ८, शास्त्रीनगर, पी. एन. नंबर १९, अमनखान प्लॉट, अकोला ४४४ ००१

६९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, एम. एस.एच.सी. कॉम्प्लेक्स, सुत गिरणीमागे, उमर रोड, नागपूर ४४०००९

७०) व्यवस्थापकीय संचालक, महराष्ट्र वीजमार्ग महामंडळ, वाशानी चेंबर्स, १ ल मजला, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०

७१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र भूविकास महामंडळ, न्यू ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग, ॲग्रीकल्चर कॉलेज कंपाऊंड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

७२) उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण प्रादेशिक विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१

७३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ, न्यू ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग, ॲग्रीकल्चर कॉलेज कंपाऊंड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

७४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाकाली मार्ग, मरोल, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३

७५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शहर आणि उद्योग विकास महामंडळ (सिडको), २ रा मजला, निर्मल बिल्डींग, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

७६) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (BMRDA), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

७७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ, एन.सी.सी. नेहरू मेमोरियल हॉल, ४-ए,डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४०००০१

७८) महाव्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जुहू सुप्रीम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड नं. १, जे. व्ही. पी.डी. स्कीम (इतर) विलेपार्ले (प.) मुंबई ४०० ०४९

७९) व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, सी.डी.ओ. बॅरॅक क्रमांक ९, योगक्षेमजवळ, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०२०

८०) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, बालरक्षक विद्यालय, १९/२१, मनोहरदास मार्ग, मुंबई ४०० ००१

८१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी विकास संकुल, न्यू ॲडमिनिस्ट्रेशन बिल्डींग, २ रा मजला, रमाबाई आंबेडकर गर्ल्स स्कूलजवळ, जूना आग्रा रोड, नाशिक -२

८२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य चर्मोद्योग विकास महामंडळ, बॉम्बे लाईफ बिल्डींग, ४५, वीर नरीमन मार्ग, ५ वा मजला, मुंबई ४०० ०२३

८३) व्यवस्थापकीय अधिकारी,महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,एक्सप्रेस टॉवर,नरीमन पॉईंट, मुंबई २०

८४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, फिल्मसिटी, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६५

८५) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ,अभ्यंकर नगर,नागपूर ४४० ०१०

८६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विदेश सेवा योजन व निर्यात प्रचालय महामंडळ (MOPBC) एक्स.के.बिल्डींग, २ रा मजला, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ३८

८७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, ९ वा मजला, न्यू एक्सेलसियर बिल्डिंग, अमृत केशव नायक मार्ग, मुंबई ४०० ००१

८८) व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ लिमिटेड, बॉम्बे मोरेवाडी, तालुका करवीर, जि. कोल्हापूर

८९) व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, बिल्डींग क्रमांक ५, व्ही. आर. देसाई रोड, आझाद नगर क्रमांक २, अंधेरी (प.) मुंबई ४०० ०५८

९०) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जुहू सुप्रीम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड, क्रमांक ९, जे.व्ही. पी.डी. स्कीम (उत्तर),विलेपार्ले (प.), मुंबई ४०० ०४९

९१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी संघ (महाटेक्स), १ ला मजला, वाशानी चेंबर्स, ४७,सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई

९२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक खरेदी विक्री संघ, गौतम बिल्डींग, झकेरिया बंदर रोड, शिवडी, मुंबई ४०००१५

९३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य तेलबिया उत्पादक सहकारी संघ, २४, रामदार कॉलनी, शिलापेठ, जळगाव- ४२५००१

९४) सदस्य सचिव व संचालक, महाराष्ट्र उर्जा व विकास संस्था (MEDA) न्यू कामानी चेंबर्स, रामजीभाई कामानी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८

९५) संचालक, हाफकिन इन्स्टिटयूट फॉर ट्रेनिंग रिसर्च ॲण्ड टेस्टींग, आचार्य दोंदे मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१२

९६) वेलफेअर कमिशनर, महाराष्ट्र लेदर वेलफेअर बोर्ड, मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३०

९७) संचालक, माजी सैनिक प्रशिक्षण उत्पादन केंद्र, सातारा

९८) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव /कार्यासने

९९) निवड नस्ती (उद्योग ४)